

।।श्रध्दावान् लभते ज्ञानम ।।

**डॉ. हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान, अहमदनगर**

द्वारा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, १०५, केडगांव देवी रोड,
अहमदनगर-४१४००५, फोन: ०२४१- २५५१४२०
Email: vpahmedngar@gmail.com , Website:www.vpahmednagar.in

आयोजित

# अहमदनगर प्रज्ञाशोध परीक्षा

**१.उद्देश:** १) इ. ५ वी व ८ वी शासना मार्फत स्कॉलरशीप परीक्षा घेतली जाते. या परीक्षेसाठी अ) जिल्ह्यातील शाळांमधील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेण्यास सहाय्य करणे. ब) प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपचे वैशिष्ट्येपुर्ण तंत्र अवगत करणे व तसा सराव करण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

२) प्रज्ञावंत विद्यार्थ्यांमध्ये जिल्हाभर निकोप स्पर्धेचे वातावरण निर्माण करणे.

३) सार्वत्रिक परीक्षा आयोजनाची व प्रशिक्षणाची संधी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे.

**२.स्वरुप:** प्रस्तुत परीक्षा ही इ. ४ थी व इ. ७ वी साठी आयोजित केली जाते. **दरवर्षी जानेवारी मध्ये रविवारी घेतली जाते.** त्यासाठी रु. २००/- शुल्क असून त्यापैकी रु. २०/- शाळेने प्रासंगिक खर्चासाठी ठेवावे. या परीक्षेचे स्वरुप इ. ५ वी व इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेप्रमाणे असेल.

**३. संपर्क:** परीक्षेची सर्व माहिती व प्रवेश प्रक्रिया www.vpahmednagar.in या संकेतस्थावर पहावयास मिळेल. ऑनलाईन नावे दिल्यानंतर त्या यादीची प्रिंट काढावी. प्रिंटवरील विद्यार्थी संख्या १८० रु. व विलंब शुल्क असल्यास प्रती विद्यार्थी रु. २००/- अशा एकुण शुल्काचा धनादेश (डी.डी) **डॉ. हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान ATS Examination अहमदनगर** या नावने काढावा. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अथवा शाळेत पैसे व फॉर्म भरु शकता. शाळा प्रमुखांच्या सही व शिक्कयांसह विद्यार्थ्यांची यादी व डी.डी किंवा रोख रक्कम मुदतीत महाविद्यालयामध्ये जमा करावी.

**४) पारितोषिके:** अनेक मान्यवरांनी बक्षीसांसाठी रोख रक्कमा दिल्या आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरुपात बक्षीसे, पारितोषिके व गौरवचिन्हे दिली जातील. प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये मराठी माध्यमांसाठी १ ते २१ गुणानुक्रम काढले जातील व इंग्रजी माध्यमांसाठी १ ते ११ गुणानुक्रमे काढले जातील. परंतु त्यापैकी **मराठी माध्यमांसाठी १ ते ११ गुणानुक्रमांच्या विद्यार्थ्यांना तर इंग्रजी माध्यमाच्या १ ते ५ गुणानुक्रमांना समारंभपूर्वक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर येथे वितरीत केले जातील.** उर्वरीत गुणानुक्रमाकांची प्रमाणपत्रे व गौरवचिन्हे निकालानंतर प्रत्येक शाळेने आपली प्रमाणपत्रे व गौरवचिन्हे किमान १५ दिवसांत घेऊन जावीत.

**५) माध्यम:** मराठी व सेमी इंग्रजी (मराठी व सेमी इंग्रजीच्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमांतून परीक्षेस बसता येईल.)

**६) परीक्षा केंद्रे:** १) नगर शहर- १ २) नगर शहर -२ ३) नगर शहर -३ ४) राहुरी ५) श्रीरामपूर ६) संगमनेर ७) शेवगांव ८) पाथर्डी ९) जामखेड १०) कर्जत ११) श्रीगोंदा १२) पारनेर १३) नेवासा १४) कोपरगांव १५) अकोले, यापैकी एका केंद्राची निवड करावी प्रतिसादानुसार केंद्र बदल करण्यात येईल.

| पेपर | विषय | प्रश्न संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम भाषा | २५ | ५० | १ तास ३० मिनिटे |
| | गणित | ५० | १०० | |
| | एकूण | ७५ | १५० | |
| २ | तृतीय भाषा | २५ | ५० | १ तास ३० मिनिटे |
| | बुध्दिमत्ता चाचणी | ५० | १०० | |
| | एकूण | ७५ | १५० | |

**प्रश्नांची काठिण्य पातळी**

* सोप्या स्वरुपाचे प्रश्न ३०% , मध्यम स्वरुपाचे प्रश्न ४०%, कठिण स्वरुपाचे प्रश्न ३०%

**महत्वाचे: फक्त इ. ७ वी साठीच्या प्रत्येक पेपरमध्ये कमाल २०% प्रशनांच्या बाबतीत उत्तरांच्या ४ पर्यायापैकी दोन अचूक असतील ते दोन्ही पर्याय नोंदविणे बंधनकारक असेल.**

**प्रक्रिया वेळापत्रक**

| अ.नं. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १) | परीक्षार्थी (ऑनलाईन) प्रवेश नोंदणी | १ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर |
| २) | विलंब शुल्कासह प्रवेश नोंदणी | १ डिसेंबर ते १५ डिसेंबर |
| ३) | शाळा व केंद्रनिहाय परीक्षा क्र. प्रसिध्दी | जानेवारी चा पहिला आठवडा |
| ४) | शाळा निहाय हॉल तिकीट वाटप | जानेवारी चा पहिला आठवडा |
| ५) | प्रज्ञाशोध परीक्षा | जानेवारीच्या तिसरा रविवार |
| ६) | निकाल जाहीर, गुणपत्रक वाटप | फेब्रुवारी चा पहिला आठवडा |
| ७) | सुचना स्विकारणे व उत्तरसुची फेरतपासणी | फेब्रुवारी चा दुसरा आठवडा |
| ८) | बक्षीस वितरण | मार्च चा पहिला आठवडा |

Scanned with CamScanner